आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता

२० नोव्हेंबर २०२३ – सोमवार

**ठळक बातम्या**

- 54 व्या इफ्फी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला गोव्यात प्रारंभ

- भारत विकसित देश व्हावा, यासाठी ज्यांच्यापर्यंत विकासाचे लाभ पोचले नाहीत, त्यांच्यापर्यंत ते पोचले पाहिजेत, असं केंद्रीय पंचायतराज राज्य मंत्री कपील पाटील यांचं आवाहन

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि पक्षचिन्हाच्या मुद्द्यावर केंद्रीय निवडणुक आयोगासमोर पुढची सुनावणी शुक्रवारी

- राज्यातली 8 लाख हेक्टर शेती सिंचनाखाली आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**आणि**

- विशाखापट्ट्णम हेरगिरी प्रकरणी, एनआयएकडून मुंबईतून एकाला अटक

**<><><><><>**

54 व्या इफ्फी, अर्थात भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन आज गोव्यात माहिती आणि प्रसारण मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांच्या हस्ते झालं. ठाकूर यांच्या हस्ते फिल्म बाजारचंही उद्घाटन झालं. हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा जागतिक चित्रपट बाजार आहे. "कॅचिंग डस्ट" या चित्रपटानं या चित्रपट महोत्वाचा प्रारंभ झाला. मिश्र आशियाई संस्कृतीचा वारसा लाभलेले ब्रिटिश चित्रपट दिग्दर्शक स्टुअर्ट गॅट हे या पुरस्कार-विजेत्या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. तत्पूर्वी

माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री, डॉ एल मुरुगन यांनी चित्रपटातले कलाकार आणि पडद्यामागच्या कलाकारांचा सत्कार केला.

या महोत्सवामध्ये यंदा २७० पेक्षा जास्त चित्रपट दाखवले जाणार आहेत. यामध्ये भारतातील २५ फीचर फिल्म आणि २० बिगर फीचर फिल्म्सचा समावेश आहे. हॉलीवुड अभिनेते आणि निर्माते मायकेल डग्लस यांना यंदाचा सत्यजीत रे जीवनगौरव पुरस्कार देऊनं गौरवण्यात येणार आहे.

<><><><><>

दिग्गज हिंदी चित्रपट अभिनेत्री माधुरी दीक्षित यांना 54 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये आज त्यांच्या भारतीय चित्रपटातील योगदानासाठी विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं . हिन्दी चित्रपट सृष्टीतील चार दशकांच्या उल्लेखनीय कामगिरीसह माधुरी दीक्षित यांनी आपल्या अभिनयाने चित्रपट जगतावर अमीट ठसा उमटवला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण, युवा व्यवहार आणि क्रीडामंत्री अनुरागसिंग ठाकुर , माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. डी एल . मुरुगण आणि गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी पणजी इथं या पुरस्काराची घोषणा केली. माधुरी दीक्षित यांना आतापर्यंत सहा फिल्मफेअर पुरस्कारांनी आणि उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून १४ वेळा सन्मानित करण्यात आलं आहे.

अभिनेत्री माधुरी दिक्षीत यांना आजवर ६ फिल्मफेअर पुरस्कारांनी तर १४ वेळा सर्वोत्कृष्ठ अभिनेत्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे.

<><><><><>

भारत विकसित देश व्हावा, यासाठी गावं विकसित झाली पाहिजेत, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पना आहे, त्यासाठी ज्यांच्यापर्यंत विकासाचे लाभ पोचले नाहीत, त्यां च्यापर्यंत ते पोचले पाहिजेत, असं केंद्रीय पंचायतराज राज्य

मंत्री कपील पाटील यांनी सांगितलं. ते आज पालघर जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त डहाणू इथं आयोजित महाशिबिराच्या उद्घाटन सोहळ्यात बोलत होते. ते म्हणाले…

**होल्ड- बाईट - कपील पाटील**

राज्यपाल रमेश बैस, पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, तसंच स्थानिक खासदार, आमदार यावेळी उपस्थित होते.

विकसित भारत संकल्प यात्रा स्थानिक उत्पादनाच्या प्रचार आणि विक्रीवर जोर देते. कौशल्य विकास हा या परिवर्तनकारी यात्रेचा आणखीन एक पैलू आहे, असं राज्यपाल बैस यांना यावेळी सांगितलं.

या कार्यक्रमात केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांनी राज्यपाल बैस यांच्या समोर आपलं मनोगत व्यक्त केलं.

**<><><><><>**

विकसित भारत संकल्प यात्रा आज नांदेड जिल्ह्यात बोधडी आणि थारा इथं पोहोचली. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती घेऊन पोहोचलेल्या संकल्प रथाचं अंगणवाडी बालक, शालेय विद्यार्थी, तसंच गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केलं. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात सरकारी अधिकाऱ्यांनी योजनांची माहिती गावकऱ्यांना दिली. उद्या ही यात्रा जलधारा आणि नंदगाव तांडा इथं पोहोचणार आहे.

थारा इथले प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी अशोक गाडेकर यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट- अशोक गाडेकर**

गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यात फुलबोडी आणि कारवाफा, अहेरी तालुक्यात वांगेपल्ली आणि चिंचगुडी, आरमोरी तालुक्यात वघाळा आणि सायगाव, तसंच गडचिरोली तालुक्यात हिरापूर आणि डोंगरगाव इथंही आज विकसित भारत संकल्प यात्रा पोहचली. तिथं नागरिकांनी यात्रेला उत्तम प्रतिसाद दिला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि पक्षचिन्हाच्या मुद्द्यावर केंद्रीय निवडणुक आयोगासमोर पुढची सुनावणी शुक्रवारी होणार आहे. नवी दिल्लीत आज झालेल्या सुनावणीत अजित पवार यांच्या गटानं सादर केलेली ९ हजार बनावट प्रतिज्ञापत्र यावेळी शरद पवार गटाच्या वतीनं सादर झाली. ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी आज युक्तीवाद केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संस्थापकांमध्ये असलेल्या एका व्यक्तीचं बनावट प्रतिज्ञापत्र अजित पवार गटानं सादर केलं होतं. त्या व्यक्तीला सिंघवी यांनी आयोगासमोर उभं केलं.

**<><><><><>**

राज्यातली 8 लाख हेक्टर शेती सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. भंडारा जिल्ह्यात आयोजित शासन आपल्या दारी या कार्यक्रमात ते बोलत होते. शासन आपल्या दारीचा हा 18 वा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाच्या मध्यमातून 1 कोटी 84 लाख लाभार्थ्यांना लाभ मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात धानाला बोनस जाहीर करणार असल्याचं मुख्यंत्र्यांनी सांगितलं. धानाला खोडकिड लागली असेल तर सरकार मदत करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. राज्यामध्ये कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षण दिलं जाणार आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या कार्यक्रमात सांगितलं. काही

जण जाणीवपूर्वक वेगळं वातावरण निर्माण करण्याचं काम करत असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

विशाखापट्ट्णम हेरगिरी प्रकरणी, एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आज मुंबईतून एकाला अटक केली. अमन सलीम शेख असं त्याचं नाव असून, तो आसाममधला आहे. आयएसआय या पाकिस्तानी गुप्तहेर संघटनेच्या जाळ्यामार्फत संरक्षणविषयक गोपनीय माहिती फोडण्याच्या या प्रकरणात आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणी एनआयए नं दोन फरार पाकिस्तानी सूत्रधारांसह चारजणांविरुद्ध या आधीच आरोपपत्र दाखल केलं आहे.

<><><><><>

लेखक हे समाजाचे दक्ष पहारेकरी असतात. ते आपल्या कार्यातून समाजाला जागरूक करतात आणि मार्गदर्शन करतात. आदिवासी समाजातील लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे हे  लेखकांचे महत्त्वाचे काम आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. ओडिशातल्या  बारीपाडा इथं अखिल भारतीय संथाली लेखक संघाच्या 36 व्या  वार्षिक संमेलन आणि साहित्य महोत्सवाचं  उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय हृदयंगम मराठी साहित्य संमेलन 2 आणि 3 डिसेंबर मॉरिशसला होणार आहेत. मॉरिशस सरकारचं कला आणि सांस्कृतिक वारसा मंत्रालयांतर्गत कार्यरत मराठी स्पीकिंग युनियन, तसेच मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन आणि कोकण मराठी साहित्य परिषद या संमेलनाचं आयोजन करणार आहे.  ज्येष्ठ संपादक, लेखक विजय कुवळेकर संमेलनाचे अध्यक्ष, शालेय शिक्षण

मंत्री दीपक केसरकर हे उद्घाटक, तर मॉरिशसमधल्या निशी हिरु या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष आहेत. कोमसापचे केंद्रीय कार्याध्यक्ष डॉ प्रदीप ढवळ यांनी कणकवलीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

या दोन दिवसीय संमेलनाच्या पहिल्या दिवशी संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याबरोबरच ग्रंथदिंडी, ग्रंथ प्रकाशन आणि प्रदर्शन, आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

**<><><><><>**

राजस्थान मधल्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक आपापल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाली आणि पिलीबंगा इथं आज जाहीर सभांना संबोधित केलं. राज्यात महिलांवरील अत्याचारात वाढ झाली असून संपूर्ण देशात राजस्थान याबाबतीत आघाडीवर आहे, तसंच राज्यात दलितांवरील गुन्हेही वाढले आहेत, अशी टीका मोदी यांनी यावेळी केली.

**//<><><><><>//**